# महाराष्ट्र शासन

# नागरिकांची सनद

## आयुक्तालय


## राज्य उत्पादन शुल्क ,

## महाराष्ट्र राज्य , मुंबई.

अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १ राज्य उत्पादन शुल्क यंत्रणा | ३ |
| २ विभागाचा पूर्व इतिहास | ४ |
| ३ प्रस्तावना व आकृतीबंध | ४-१२ |
| ४ विभागाची वैशिष्टये | ९ |
| ५ विभागाचे नागरीक | ९ |
| ६ विभागाच्या अपेक्षा | ९ |
| ७ अबकारी बाबत शासनाचे धोरण | १० |
| ८ विभागाची उद्दिष्टे | १० |
| ९ विभागाचा उद्देश | १० |
| १० विविध अनुज्ञप्त्या मंजूर करण्यासाठी कालमर्यादा / सक्षम अधिकारी | ११ |
| ११ देशी विदेशी मद्य किरकोळ विक्री अनुज्ञप्ती स्थलांतर करणे | ११ |
| १२ विभागातील अधिकाऱ्यांचे दूरध्वनी क्रमांक | १३ |
| १३ तक्रार निवारण अधिकारी | १५ |
| १४ नागरीक सनदेचा आढावा घेण्यासाठी मुदत | १६ |

**१.राज्य उत्पादन शुल्क यंत्रणा**



## २.विभागाचा पूर्व इतिहास

ब्रिटीश कालावधीत हा विभाग राज्य उत्पादन शुल्क म्हणून ओळखला जात असे. महसूल संकलीत करण्यासाठी मद्य , ताडी, अफू, गांजा व भांग इत्यादी बाबी राज्य सरकारच्या नियंत्रणाखाली देण्यात आल्या. राज्याचा महसूल वाढविण्यासाठी उत्पादन शुल्क पध्दत सन १७९० पासून सुरू करण्यात आली. त्यानंतर सन १८७८ मध्ये मद्य व गुंगी आणणाऱ्या पदार्थांच्या व्यापारातील जादा महसूल मिळण्यासाठी मुंबई उत्पादन शुल्क कायदा अंमलात आणण्यात आला.

स्वातंत्र्याची लढाई व स्वदेशी चळवळ या काळात दारुच्या दुष्परिणामावर सन १९३८ मध्ये काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनात प्रकाश टाकून पूर्ण दारुबंदी करण्यासाठी मुंबई दारुबंदी कायदा १९४९ अंमलात आणण्यात आला.दिनांक १६/६/१९४९ दारुबंदी कायदा अंमलात आल्याने राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दारुबंदी व उत्पादन शुल्क विभाग असे बदलण्यात आले.

सन १९६४ पासून दारुबंदी धोरणाचे महत्व कमी होत गेल्याने १९६८ मध्ये ताडी व बिअरची योजना अंमलात आणण्यात आली. आसवन्या व मद्य निर्माण्या स्थापन करण्यात आल्या व सन १९७३ मध्ये देशी व विदेशी दारुच्या किरकोळ विक्रीसाठी मोठ्या प्रमाणावर अनुज्ञप्त्या मंजूर करण्यात आल्या.

उपरोक्त धोरणामुळे व योजनामुळे या विभागाचा सन १९६४ मध्ये असलेला महसूल रुपये १.६४ कोटी व सन २०२१-२२ मध्ये १७२२८.८४ कोटी वाढला आहे. राज्याचा / विभागाचा शासकीय महसूल वाढविण्याचा उद्देश विचारात घेऊन या विभागाचे दारुबंदी व राज्य उत्पादन शुल्क विभागाऐवजी दिनांक **२८.१२.१९८९** पासून राज्य उत्पादन शुल्क असे नांव बदलण्यात आले व या विभागाअंतर्गत असलेल्या दारुबंदी प्रचार हा विभाग समाज कल्याण विभागाला जोडण्यात आला.

## ३. प्रस्तावना व आकृतीबंध

१. या विभागाची नागरी सनद प्रसृत करताना या विभागाच्या नागरीकांना विभागा विषयी माहिती असणे आवश्यक असल्याने विभागाची रचना, कार्ये व विभागात विविध स्तरांवर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांची माहिती दर्शविणारी प्रस्तावना देण्यात येत आहे.

२. भारतीय संविधान १६६ अनुच्छेदान्वये महाराष्ट्र राज्य शासकीय कामकाज नियमात शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग क्रमांक. आरओबी.१०८९/अठरा (ओ ॲन्ड एम) दिनांक २८ डिसेंबर,१९८९ पाचवी सुधारित नियमावली १९८९ मध्ये अस्तित्वात आली. तद्नुसार या विभागाचे दारुबंदी व उत्पादन शुल्क हे नाव बदलून राज्य उत्पादन शुल्क असे करण्यात आले आहे.

३. या विभागाचे आयुक्त हे विभाग प्रमुख असून त्यांना विभागाचे कामकाज / ध्येयधोरण यांच्या पुर्ततेसाठी / अंमलबजावणी करिता मुख्यालयात एक अपर आयुक्त , तीन सह आयुक्त, तीन उपआयुक्त (वरिष्ठ श्रेणी ) , दोन उप आयुक्त (कनिष्ठ श्रेणी) , एक सह आयुक्त (अंमलबजावणी व दक्षता) , एक उप संचालक (सांख्यिकी व संगणक), संशोधन सहाय्यक, एक मुख्य लेखाधिकारी , लेखा अधिकारी व चार सहाय्यक आयुक्त व महाराष्ट्र भरारी पथक हे सहाय्य करतात. त्याचप्रमाणे विभागीय / जिल्हास्तरावर तसेच क्षेत्रिय स्तरावर अधिकारी व कर्मचारी सहाय्य करतात.

४. या विभागाकडून खालील अधिनियमांची अंमलबजावणी करण्यात येते.

अ) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९.

ब) महाराष्ट्र अफू ओढण्याबाबत अधिनियम, १९३६

क) मुंबई औषधीद्रव्ये (नियंत्रण ) अधिनियम, १९५९.

ड) मुंबई मळी (नियंत्रण) अधिनियम, १९५६.

इ) दि नारकोटीक अ‍ॅन्ड सायकोट्रॉपिक सबस्टन्सेस अधिनियम, १९८५.

या विभागाची प्रमुख कामे म्हणजे विविध अबकारी अनुज्ञप्त्या देणे, त्यांची नियमानुसार तपासणी करणे व विशेषत: मुंबई दारुबंदी अधिनियम १९४९ नुसार असलेल्या विविध नियंत्रणाची अंमलबजावणी करणे ही आहेत. त्याशिवाय एन.डी.पी.एस.कायदा १९८५ अंतर्गत अंमली पदार्थ विषक गुन्ह्यांचा तपास करणे गुन्हे नोंदवून त्या संबंधीची प्रकरणे न्यायालयात देखील दाखल करणे इत्यादी जबाबदारीही या विभागाकडे सोपविण्यात आली आहेत.

५. विभागीयस्तर : राज्यस्तरावर आयुक्त राज्य उत्पादन शुल्क यांनी विभागाची ध्येय धोरणे ठरविणे व शासनाच्या मान्यतेने त्याची अंमलबजावणी करणे, सदर ध्येय धोरणांची व विविध नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा स्तरावर अधीक्षक ‘गट अ’ अधिकाऱ्यांची नेमणूक केली असून तालुका पातळीवर निरीक्षक / दुय्यम निरीक्षक ध्येय धोरणांची व नियमांची अंमलबजावणी करतात.

जिल्हास्तरावरील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी (जिल्हा अधीक्षक ) व आयुक्त यांच्या दरम्यान समन्वय ठेवण्यासाठी विभागीय पातळीवर तसेच जिल्हा पातळीवरील कार्यालयाचे पर्यवेक्षण व प्रशासकीय नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने शासनाने दिनांक ७/९/१९८९ च्या निर्णयानुसार चार विभागीय कार्यालये, तसेच शासन निर्णय दि.१/१/२००३ अन्वये दोन विभागीय (नाशिक, कोल्हापूर ) कार्यालये सुरु करण्यास तसेच शासन निर्णय दि. ०५/०१/२०२२ अन्वये आणखी दोन विभागीय कार्यालये ( अमरावती, नांदेड ) सुरु करण्यास मंजूरी दिली आहे. अशा रितीने या विभागात आठ विभागीय कार्यालये सुरु करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | विभागीय कार्यालयाचे मुख्यालये | अंतर्गत जिल्हे |
|---|---|---|
| १. | बृन्हमुंबई | मुंबई शहर, मुंबई उपनगरे — १ , मुंबई उपनगरे — २ |
| २ | ठाणे | ठाणे-१, ठाणे-२, रायगड, पालघर. |
| ३ | नाशिक | नाशिक -१, नाशिक -२, धुळे, नंदूरबार व जळगांव |
| ४ | पुणे | पुणे-१, पुणे-२ ,अहिल्यानगर -१ अहिल्यानगर -२ व सोलापूर |
| ५ | कोल्हापूर | कोल्हापूर, सांगली , सातारा , रत्नागिरी व सिंधुदुर्ग |
| ६ | छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर , जालना , बीड व धाराशिव |
| ७ | नांदेड | नांदेड, लातूर, हिंगोली व परभणी |
| ८ | अमरावती | अमरावती , बुलढाणा, अकोला, वाशिम व यवतमाळ |
| ९ | नागपूर | नागपूर-१, नागपूर -२, वर्धा,भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली व गोंदिया. |

(अ) गुन्हे अन्वेषणाच्या कामात पोलीस विभाग व राज्य उत्पादन शुल्क विभागात समन्वय साधण्याच्या दृष्टिकोनातून संचालक (अंमलबजावणी व दक्षता) या पदाची निर्मिती करण्यात आली असून, सदर पद पोलीस विभागातील, जिल्हा पोलीस अधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याच्या पदनियुक्ती किंवा विभागातील उपआयुक्त (वरिष्ठ श्रेणी) संवर्गातून भरण्याच्या तरतुदी आहेत. संचालक ( अंमलबजावणी व दक्षता) यांच्यावर राज्यातील भरारी पथकांमार्फत व अन्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत केल्या जाणाऱ्या गुन्हे अन्वेषणाच्या कामावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी सोपविली आहे.

महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ च्या अंमलबजावणीचे काम प्रभाविपणे करता यावे तसेच या व इतर अन्य बाबी समवेत मद्यार्क निर्मिती, वापर व व्यापार यासाठी दिलेल्या अनुज्ञप्तीधारकांनी केलेल्या गैरप्रकाराबाबतची चौकशी करणे, भरारी पथकाच्या कामकाजावर देखरेख ठेवणे व हातभट्ट्यांना आळा घालणे, पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी यांच्यामध्ये समन्वय साधणे याकरिता शासन निर्णय गृह विभाग क्रमांक पीईओ/०१८०/३/(२६०)-पीआरओ-४, दि.२० ऑगस्ट, १९८० अन्वये उपआयुक्त, दारूबंदी आणि उत्पादन शुल्क (दक्षता), महाराष्ट्र राज्य, मुंबई, या नावाने नव्याने पद निर्माण करण्यात आले. सदरचे पद अधीक्षक, दारूबंदी व उत्पादन शुल्क, वर्ग-१ या दर्जाचे करण्यात आले. तद्नंतर शासन निर्णय क्रमांक ईएसटी-३३८९/४०२(१)/पीआरओ-४, दि.२० सप्टेंबर, १९८९ अन्वये संचालक (दक्षता) या पदाचे नाव बदलून व त्याच्या श्रेणीमध्ये वाढ करून संचालक (अंमलबजावणी व दक्षता) असे करण्यात आले आणि अंमलबजावणी व दक्षता ही दोन्ही कामे त्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्याचे निश्चित करण्यात आले. सदर पद पोलीस अधीक्षक श्रेणीतील अधिकारी प्रतिनियुक्तीवर घेऊन भरण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला. तद्नंतर शासन अधिसूचना क्रमांक ईएसटी-३३९६/६०/ईएक्ससी-४, दि.०५ एप्रिल, २००२ अन्वये सदर पद उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क (वरिष्ठ श्रेणी) किंवा भारतीय पोलीस सेवेतील पोलीस अधीक्षक / पोलीस उपआयुक्त श्रेणीमधून प्रतिनियुक्तीद्वारे बदलीने भरण्यात येईल अशी नियमात तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे उक्त पदावर नियुक्ती दिनांक ५ एप्रिल, २००२ च्या नियमानुसार अन्वये करण्यात येत असते.

(ब) मुंबई शहर व उपनगरे, ठाणे व पुणे या जिल्ह्यांतील अधीक्षकांची पदे अपग्रेड करून अधीक्षक, निवडश्रेणी या संवर्गात ४ पदांना उपरोल्लेखित दिनांक १ जानेवारी, २००३ च्या शासन निर्णयाद्वारे मंजुरी दिली आहे. सदर पदांच्या नियमावल्या तयार करणे व त्यानुसार पात्र व्यक्तींची निवड करण्याची कार्यवाही शासन स्तरावरून प्रगती पथावर आहे. नंदुरबार, वाशिम, हिंगोली व गोंदिया या ४ नवनिर्मित जिल्ह्यांसाठी अधीक्षकांच्या कार्यालयाची स्थापना करण्यास उपरोक्त शासन निर्णयाद्वारे मान्यता दिली आहे.

(क) राज्यातील जिल्ह्यांची अनुज्ञप्त्यांच्या संख्येआधारे "अ", "ब", "क" व "ड" गटात विभागणी करण्यात आली असून १,००० पेक्षा अधिक प्रधान अनुज्ञप्त्या असलेल्या ४ जिल्ह्यांचा अंतर्भाव "अ" श्रेणीत करण्यात आला आहे, ४०० ते १००० प्रधान अनुज्ञप्त्या असलेल्या जिल्ह्यांचा अंतर्भाव "ब" श्रेणीच्या जिल्ह्यात, ४०० पर्यंत अनुज्ञप्त्या असलेल्या जिल्ह्यांचा अंतर्भाव "क" गटात आणि एकही प्रधान अनुज्ञप्ती नसलेल्या वर्धा व गडचिरोली या दोन जिल्ह्यांचा अंतर्भाव "ड" गटात करण्यात आला आहे.

(ड) "अ" व "ब" श्रेणीतील जिल्ह्यांसाठी १२५ प्रधान अनुज्ञप्त्यांकरिता निरीक्षकांचा एक गट तर "क" श्रेणीतील जिल्ह्यांसाठी १०० मुख्य अनुज्ञप्त्यांसाठी निरीक्षकांचा एक गट अशी पुनर्रचना करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. निरीक्षकांच्या एका गटात १ निरीक्षक, २ दुय्यम निरीक्षक व १ सहाय्यक दुय्यम निरीक्षक (रायटर), ३ जवान व १ जवान-नि-वाहनचालक अशा ८ कर्मचाऱ्यांचा १ घटक मंजूर करण्यात आला आहे.

(ई) विभागाचा दिवसेंदिवस वाढत जाणारा कामाचा व्याप विचारात घेऊन मुंबई (उपनगरे), पुणे व नागपूर या जिल्ह्यांकरिता सध्याच्या उपअधीक्षकांखेरीज प्रत्येकी एक अतिरिक्त उपअधीक्षकाचे एक पद निर्माण करण्यास व त्याखेरीज खालील जिल्ह्यांत प्रत्येकी एक उप-अधीक्षकाचे नवीन पद निर्माण करण्यास उपरोक्त शासन निर्णयाद्वारे मान्यता दिली आहे.

१. रत्नागिरी, २. रायगड, ३. सांगली, ४. नाशिक, ५. कोल्हापूर, ६. छत्रपती संभाजीनगर.

महाराष्ट्र राज्य हे मद्यार्क निर्मितीतील एक प्रमुख राज्य असल्याने शेजारी राज्यातून मळी व मद्यार्कासाठी मागणी असते व महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात मळी / मद्यार्क व पेय मद्य निर्यात केले जाते.

परराज्यातून होणाऱ्या मद्य तस्करीवर आळा घालण्यासाठी व पर्यायाने होणाऱ्या शासन महसुलाची हानी टाळण्यासाठी राज्यात विभागाचे एकूण १२ सीमा तपासणी नाके खालीलप्रमाणे कार्यरत आहेत.

**तपासणी नाके**

| अ.क्र | तपासणी नाका | तालुका | जिल्हा |
|---|---|---|---|
| १ | दापचारी | डहाणू | पालघर |
| २ | करंजळी | पेठ | नाशिक |
| ३ | हाडाखेड | शिरपूर | धुळे |
| ४ | खेडदिगर | शहादा | नंदुरबार |
| ५ | पुर्नाड | मुक्ताईनगर | जळगाव |
| ६ | वरुड | वरुड | अमरावती |
| ७ | मानेगाव टेक | रामटेक | नागपूर |
| ८ | देवरी | देवराई | गोंदिया |
| ९ | उमरगा | उमरगा | उस्मानाबाद |
| १० | मंद्रुप | दक्षिण सोलापूर | सोलापूर |
| ११ | कागल | कागल | कोल्हापूर |
| १२ | इन्सुली | सावंतवाडी | सिंधुदुर्ग |

वरील प्रत्येक तपासणी नाक्यासाठी १ निरीक्षक , २ दुय्यम निरीक्षक , १ सहाय्यक दुय्यम निरीक्षक (रायटर ) , ४ जवान , १ जवान-नि-वाहनचालक ही पदे निर्माण करण्यात आली आहेत. तसेच प्रत्येक तपासणी नाक्यासाठी एक जीप मंजूर करण्यात आली आहे.

शासनाने परिवहन विभाग, विक्रीकर विभाग व राज्य उत्पादन शुल्क विभाग या तिन्ही विभागाची एकत्रित सीमा तपासणी नाके २४ ठिकाणी सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे.

| अ.क्र | तपासणी नाका | तालुका | जिल्हा |
|---|---|---|---|
| १ | दापचारी | डहाणू | पालघर |
| २ | करंजळी | पेठ | नाशिक |
| ३ | हाडाखेड | शिरपूर | धुळे |
| ४ | खेडदिगर | शहादा | नंदुरबार |
| ५ | पुर्नाड | मुक्ताईनगर | जळगाव |
| ६ | वरुड | वरुड | अमरावती |
| ७ | मानेगाव टेक (कंद्री) | रामटेक | नागपूर |
| ८ | देवरी रिपूर | देवराई | गोंदिया |
| ९ | उमरगा | उमरगा | उस्मानाबाद |
| १० | मंद्रुप ( नांदणी ) | दक्षिण सोलापूर | सोलापूर |
| ११ | कागल | कागल | कोल्हापूर |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | इन्सुली (बांदा) | सावंतवाडी | सिंधुदुर्ग |
| १३ | नवापूर (बेडकीपाडा) | नवापूर | नंदूरबार |
| १४ | पिंपळकुट्टी | पांढरकवडा | यवतमाळ |
| १५ | मारवाडे | मंगळवेढा | सोलापूर |
| १६ | सावनेर | सावनेर | नागपूर |
| १७ | बोरगांव | सुरगणा | नाशिक |
| १८ | राजुरा | राजुरा | चंद्रपूर |
| १९ | बिलोली | बिलोली | नांदेड |
| २० | चोरवड | रावेर | जळगाव |
| २१ | देगलूर | देगलूर | नांदेड |
| २२ | खरपी | चांदुरबाजार | अमरावती |
| २३ | अक्कलकुवा | अक्कलकुवा | नंदुरबार |
| २४ | चंदगड | चंदगड | कोल्हापूर |
| २५ | शिनोली | चंदगड | कोल्हापूर |

**विभागाचे सुधारीत आकृतीबंध**

राज्य उत्पादन शुल्क विभागातील ३६११ पदांचा आकृतीबंध शासन निर्णय दि. ०१.०१.२००३ अन्वये निश्चित करण्यात आला होता. त्यानंतर, पालघर जिल्हयाची निर्मिती झाली असून शासन निर्णय, दि. ०२.०९.२०२१ अन्वये राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या ३६११ पदांच्या आकृतीबंधामध्ये १८९ पदांची वाढ करुन ३२ संवर्गासाठी एकूण ३८०० पदांचा सुधारीत आकृतीबंध निश्चित करण्यात आला होता. तथापी नांदेड व अमरावती या दोन प्रादेशिक विभागाची निर्मिती झाल्यामुळे ४२ नविन पदे निर्मण झाले, अशाप्रकारे सद्य: स्थितीत एकृण ३८४२ एवढ्या पदांना मान्यता प्राप्त आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागात सद्य: स्थितीत, कोकण,पुणे, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, अमरावती, नागपूर,नाशिक व कोल्हापूर असे एकूण ८ प्रादेशिक विभाग आहेत. विभागीय स्तरावरील अधिकाऱ्याला विभागीय उपायुक्त असे संबोधण्यात येते. सदर पद हे उपायुक्त या संवर्गातील (वरिष्ठ श्रेणी) दर्जाचे आहे.

विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क, नागपूर विभाग, नागपूर यांच्या कार्यक्षेत्रात पुर्वी ११ जिल्हे होते महसूल विभाग अमरावती व नागपूर यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व जिल्हे राज्य उत्पादन शुल्क, नागपूर यांच्या कार्यक्षेत्रात येत होते. तसेच कार्यक्षेत्रातील जिल्हयांना मध्यप्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा या राज्यांच्या सिमा आहेत. विभागीय उपायुक्त, नागपूर यांचे कार्यक्षेत्र मोठे असल्यामुळे तसेच, मद्य विक्रीच्या अनुज्ञप्त्यांमध्ये मोठी वाढ झालेली असल्यामुळे, कामकाजात वाढ झाली होती. प्रभावी नियंत्रणाच्या दृष्टीन राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या नागपूर विभागाचे नागपूर व अमरावती या महसूल विभागाप्रमाणे २ नविन प्रादेशिक विभाग निर्माण करणे आवश्यक होत.

तसेच, विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यक्षेत्रात एकूण ८ जिल्हे होते. छत्रपती संभाजीनगर विभागातून राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत राज्याला मिळणाऱ्या महसूलाच्या अंदाजे एकूण २९% वाटा प्राप्त होत होता. त्यांच्या कार्यक्षेत्रातील जिल्हयांना तेलंगणा व कर्नाटक या राज्यांच्या सीमा असल्याने मद्य तस्करीची शक्यता जास्त होती. छत्रपती संभाजीनगर विभागाची लोकसंख्या, क्षेत्रफळ, गुन्हा अन्वेषण, अनुज्ञप्तींची संख्या, महसूल इ.चे अवलोकन केले असता छत्रपती संभाजीनगर विभागाचे छत्रपती संभाजीनगर व नांदेड या दोन प्रादेशिक विभागात विभाजन करणे आवश्यक होते.

त्याअनुषंगाने, राज्य उत्पादन शुल्क विभागातील नागपूर व छत्रपती संभाजीनगर या प्रादेशिक विभागांचे विभाजन करुन अनुक्रमे अमरावती व नांदेड असे दोन नवीन प्रादेशिक विभाग निर्माण करण्याची व त्यासाठी विविध संवर्गातील ४२ पदे नव्याने निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने शासन अ.मु.स. (सेवा), सामान्य प्रशासन विभाग व सचिव (व्यय), वित्त विभाग यांच्या उप समितीने दि. २४.११.२०२१ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार व मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत उच्चस्तरीय सचिव

समितीने चक्रीय पध्दतीने दि. २०.११.२०२१ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार, अमरावती व नांदेड या दोन प्रादेशिक विभागासाठी खालीलप्रमाणे प्रत्येकी १९ प्रमाणे ३८ नियमित पदे व बाह्ययंत्रणेव्दारे प्रत्येकी २ प्रमाणे ४ पदे अशी एकूण ४२ नवीन पदे निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. (सोबत शासन निर्णय जोडला आहे)

**राज्य उत्पादन शुल्क विभागातील शासननिर्णय, गृह विभाग, क्र.इसटी-१६१६/प्र.क्र.२००/राउशु-१, दि.०२.०९.२०२१ व शासन निर्णय, गृह विभाग क्र. बीजीटी-१०२१/प्र.क्र.९६/राउशु-१, दि.०५.०१.२०२२ च्या शासननिर्णयान्वये ३८४२ पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. सदरच्या पदांव्यतिरीक्त शासन निर्णय गृह विभाग क्र इएसटी-१७२५/प्र.क्र.१२२(१)राउशु-१ , दि.३१.०७.२०२५ च्या शासननिर्णयान्वये विविध २४ संवर्गात १२२३ पदे (नियमित १०८८ व बाहययंत्रणा १३५) आणि संगणकीय सल्लागार स्वरुपाची ९ पदे अशा एकूण १२३२ नवीन पदांच्या निर्मितीस मंजूरी दिलेली आहे. यामध्ये शासन खर्चाची ६०९ पदे नियमित पध्दतीने, १३५ पदे बाहय यंत्रणेव्दारे व ९ संगणकीय सल्लागार स्वरुपची पदे अशी एकूण ७५३ नवीन पदे निर्माण करण्यास मान्यता दिलेली आहे. तसेच अनुज्ञप्तीधारकांकडून खर्च भागविण्यात येणारी पर्यवेक्षकीय स्वरुपाची ४७९ पदे निर्माण करण्यास मान्यता दिलेली आहे.**

## ४.विभागाची वैशिष्ठये

- शासनास महसुल मिळवून देणारा एक महत्वपुर्ण विभाग.
- कमीत कमी प्रसासकीर्य खर्चात कामकाज करणारा विभाग.
- विभागाच्या नागरीकांना तत्परतेने सेवा देणारा विभाग.

## ५.विभागाचे नागरीक

- मळी / मद्यार्क / मद्य उत्पादन करणारे कारखाने.
- मद्य सेवन करणाऱ्या व्यक्ती .
- अनधिकृत मद्याने पिडीत .
- सर्व प्रकारचे मद्य परवाना धारक.

## ६. विभागाच्या अपेक्षा

- ➢ राज्याच्या प्रगतीसाठी वापरण्यात येणाऱ्या राज्य उत्पादन शुल्क उत्पादनाचे स्त्रोत असलेल्या मद्य निर्मितीसाठी व विक्री बाबतच्या नियमांचे / कायद्याचे पालन करुन उत्पादन शुल्क वाढविण्यामध्ये सहभागी होणे.
- ➢ मद्य सेवन करावयाचे असेल तर प्रचलित नियमांचे पालन करावे.
- ➢ उत्पादन शुल्क भरलेलेच मद्य खरेदीने सेवन करावे.
- ➢ अधिकृत किरकोळ विक्रेत्याकडून अथवा परवाना कक्षातून मद्य विकत घ्यावे.
- ➢ मद्य सेवन परवाना धारण करावा.
- ➢ गावठी दारु विरुध्द आमच्या मोहिमेस साथ करा.

## ७.अबकारी बाबत शासनाचे धोरण

- विविध प्रकारची मद्य उत्पादने अनुज्ञप्तीद्वारे विधिवत नियंत्रित करणे.
- सध्या भारतीय बनावटीचे विदेशी मद्य किरकोळ विक्रीसाठी देण्यात येणाऱ्या अनुज्ञप्ती मंजूरीवर निर्बंध आहेत. मात्र एफएल-III अनुज्ञप्त्या ( परवाना कक्ष) एफएलबीआर-II (सीलबंद बिअर विक्री) अनुज्ञप्त्या मंजूर केल्या जातात.
- महाराष्ट्र राज्यात देशी / विदेशी मद्य खरेदी करणे , जवळ बाळगणे,वाहतूक करणे ,वापरणे आणि प्राशन करण्याबाबत कमीत कमी २५ वर्ष वय आहे. परंतू सौम्य बिअर साठी सदरचे वय २१ वर्ष आहे.
- मात्र वर्धा, गडचिरोली जिल्ह्यात संपूर्ण दारुबंदी असून मद्य सेवन फक्त वैद्यकीय शिफारशीनुसार करता येते.

## ८.विभागाची उद्दिष्टे

- मद्यार्कयुक्त पेयांच्या कायदेशीर उत्पादन व विक्रीपासून तसेच विविद्य अनुज्ञप्ती शुल्काच्या माद्यमातून महसूल वाढविणे.
- मुंबई दारुबंदी कायदा, १९४९ अंतर्गत मद्यार्कयुक्त पेयांचे उत्पादन करणेसाठी , घाऊक व किरकोळ विक्रीसाठी तसेच वापरासाठी ,औषधे व सौंदर्य प्रसाधनांच्या उत्पादनासाठी व मद्यार्काच्या औद्योगिक वापरासाठी अनुज्ञप्ती मंजूर करणे.
- मळी उत्पादनासाठी, मळी विक्रीसाठी व मळीच्या उर्ध्वपतनासाठी व मद्यार्काच्या औद्योगिक वापरासाठी अनुज्ञप्ती मंजूर करणे.
- शुध्द मद्यार्काच्या उत्पादनासाठी , मद्य उत्पादनासाठी व मद्यार्काच्या औद्योगिक वापरासाठी अनुज्ञप्ती मंजूर करणे.
- मुंबई दारूबंदी कायदा, १९४९ व एन.डी.पी.एस.ॲक्ट ,१९८५ नुसार अनुक्रमे मादक पदार्थांच्या बेकायदेशीर उत्पादनास प्रतिबंध करणे व नार्कोटिक्स ड्रग्जवर नियंत्रण ठेवणे.

## ९.विभागाचा उद्देश

- मद्यार्कयुक्त पेयाच्या उत्पादनास, विक्रीस व वापरास नियंत्रित व नियमित करुन उत्पादन शुल्क वाढविणे.
- साध्या व पारदर्शक नियमावलीवर आधारीत कार्यपध्दती तयार करुन सर्व माहिती पुस्तिकेद्वारे प्रसिध्द केली जाईल.
- आवश्यक कागदपत्रांची यादी व छापील अर्ज पुरविण्यात येतील.
- अनुज्ञप्ती व परवाना मंजूरी कालबध्द असलेले नागरीकांच्या संपर्कात असणाऱ्या / जवळच्या राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांना जास्तीत जास्त अधिकार देण्यात येतील.
- महसूल जमा विवरण व अभिलेख सुटसुटीत करुन माहिती व तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर केला जाईल.
- विभागाचे अधिकारी विनम्र , सौजन्यशिल आणि दृढ निश्चयी असतील , ते निरीक्षणासाठी येताना गणवेषात असतील तसेच त्यांच्याकडे ओळखपत्र किंवा अधिकार पत्र असेल.
- निरीक्षण पत्राचे नमुने तयार केले जातील व निरीक्षण अहवाल व इतर कागदपत्रे अनुज्ञप्ती धारकांना जागीच दिली जातील.
- कायद्याचे पालन करणाऱ्या नागरीकांना त्रास होणार नाही याची दक्षता घेतली जाईल. तक्रारीवर त्वरीत कार्यवाही केली जाईल.

- ❖ जनतेशी सौजन्यशील / सौजन्यपूर्वक संबंध ठेवण्यास / वाढविण्यात येतील.
- ❖ नागरीकांच्या तत्पर सेवेसाठी सूचना स्वागतार्ह आहेत.

## १०. विविध अनुज्ञप्ती मंजूर करण्यासाठी कालमर्यादा /सक्षम अधिकारी.

सोबत अधिसूचना जोडलेली आहे.

११. **देशी / विदेशी मद्य किरकोळ विक्री अनुज्ञप्ती स्थलांतर करणे**

**अ)** देशी/विदेशी किरकोळ मद्य विक्री अनुज्ञप्तीचे दुकान तालुका अंतर्गत जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने स्थलांतर केले जाते.
**ब)** देशी/विदेशी किरकोळ मद्य विक्री अनुज्ञप्तीचे दुकान एका जिल्हयात एका तालुक्यातून दुसऱ्या तालुक्यात ३०% कोट्यांतर्गत (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून) आयुक्तांच्या मान्यतेने स्थलांतर केले जाते. तसेच मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन जिल्ह्यामध्ये होणाऱ्या स्थलांतरात पूर्व मान्यता आवश्यक राहील. मात्र ३०% कोटयाची अट लागू होणार नाही.
**क)** देशी/विदेशी किरकोळ मद्य विक्री अनुज्ञप्तीचे दुकान एका जिल्हायातून दुसऱ्या जिल्ह्यात १५% कोट्यांतर्गत स्थलांतर शासन स्तरावर करण्यात येते.

महाराष्ट्रे देशी मद्य नियमावली, १९७३ च्या नियम २५ मधील तरतुदीनसार सीएल-III अनुज्ञप्तीचे स्थलांतर करण्यासाठी पुढील अटीची पूर्तता होणे आवश्यक आहे.

१) मागील पाच वर्षाच्या मद्यविक्रीपैकी पहिल्या वर्षाच्या मद्य विक्रीपेक्षा पुढील ४ वर्षापैकी कोणत्याही दोन वर्षाची मद्य विक्री कमी असली पाहिजे किंवा पाच वर्षाचा मद्य विक्री ही वार्षिक सरासरीपेक्षा सदर पाच वर्षापेकी कोणत्याही तीन वर्षाची मद्य विक्री कमी असली पाहिजे. परंतु सदर कालावधीसाठी अनुज्ञप्तीचे नुतनीकरण होऊन अनुज्ञप्ती वैध असली पाहीजे .[(नियम २५ (डी) (i)]

२) त्या भागात राहणाऱ्या लोकांची मद्य पिण्याची गैरसोय होऊ नये. [(नियम २५ (डी) (ii)]

३) अनुज्ञप्तीचे दुकान ज्या गावच्या ग्रामपंचायती भागात स्थलांतरीत करण्याबाबत प्रस्तावित केलेले आहे त्या ग्रामपंचायतीने ग्रामसभा घेऊन ना-हरकत देणे आणी जर ग्रामपंचायत भागा व्यतिरिक्त इतर ठिकाणी स्थलांतर प्रस्तावित केले असल्यास संबंधित नगरपरिषदेचे ना-हरकत देणे. [(नियम २५ (डी) (iii)]

४) (अ) प्रस्तावित जागा ही महाराष्ट्र देशी मद्य नियमावली, १९७३ च्या नियम, २४ (४) व (५) मधील तरतूदीनुसार अंतरनिर्बंधमुक्त असावी. तसेच राज्य/ राष्ट्रीय महामार्ग अंतरबाधित क्षेत्रामध्ये नसावी.

(ब) शासन अधिसूचना दि. १९.०९.२०१९ मधील तरतूदीनुसार, १००० मीटर हवाई अंतरात दुसरी तत्सम अनुज्ञप्ती स्थित नसावी.

५) ज्या जागेत अनुज्ञप्ती स्थ्लांतरीत करावयाचे प्रस्तावित केलेले आहे त्याचे बांधकाम अधिकृत असावे आणि सक्षम स्थानिक प्राधिकाऱ्याचा दाखला घ्यावा. [(नियम २५ (डी) (v)]

६) एका जिल्हयातून दुसऱ्या जिल्हयात स्थलांतरीत होणाऱ्या अनुज्ञप्तीच्या दुकानांची संख्या ही जिल्हयातील चालू असलेल्या अनुज्ञप्ती दुकानाच्या एकूण संख्येच्या १५% पेक्षा जास्त असू नये. तसेच एका तालुक्यातून दुसऱ्या तालुक्यात स्थलांतरीत होणाऱ्या अनुज्ञप्तीच्या दुकानांची संख्या ही जिल्हयातील चालू असलेल्या अनुज्ञप्ती दुकानाच्या एकूण ३०% पेक्षा जास्त असू नये.

महाराष्ट्र विदेशी मद्य नियमावली, १९५३ च्या नियम, २५ मधील तरतुदीनसार एफएल-II अनुज्ञप्तीचे स्थलांतर करण्यासाठी पुढील अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे.

१) मागील पाच वर्षाच्या मद्यविक्रीपैकी पहिल्या वर्षाच्या मद्य विक्रीपेक्षा पुढील ४ वर्षापैकी कोणत्याही दोन वर्षाची मद्य विक्री कमी असली पाहिजे किंवा पाच वर्षाच्या मद्य विक्री ही वार्षिक सरासरीपेक्षा सदर पाच वर्षापेकी कोणत्याही तीन वर्षाची मद्य विक्री कमी असली पाहिजे. परंतु सदर कालावधीसाठी अनुज्ञप्तीचे नुतनीकरण होऊन अनुज्ञप्ती वैध असली पाहिजे .[(नियम २५ (४) (डी) (i)]

२) त्या भागात राहणाऱ्या लोकांची मद्य पिण्याची गैरसोय होऊ नये. [(नियम २५ (४) (डी) (ii)]

३) अनुज्ञप्तीचे दुकान ज्या गावच्या ग्रामपंचायती भागात स्थलांतरीत करण्याबाबत प्रस्तावित केलेले आहे त्या ग्रामपंचायतीने ग्रामसभा घेवून ना-हरकत देणे आणी जर ग्रामपंचायत भागा व्यतिरिक्त इतर ठिकाणी स्थलांतर प्रस्तावित केले असल्यास संबंधित नगरपरिषदेचे नाहरकत देणे. [(नियम २५ (४) (डी) (iii)]

४) (अ) प्रस्तावित जागा ही महाराष्ट्र देशी मद्य नियमावली, १९५३ च्या नियम २५ (२) व (३) मधील तरतूदीनुसार अंतरनिर्बंधमुक्त असावी. तसेच राज्य/ राष्ट्रीय महामार्ग अंतरबाधित क्षेत्रामध्ये नसावी.

(ब) शासन अधिसूचना दि. २३.०२.२०२१ मधील तरतूदीनुसार, २०० मीटर हवाई अंतरात दुसरी तत्सम अनुज्ञप्ती स्थित नसावी.

५) ज्या जागेत अनुज्ञप्ती स्तलांतरीत करावयाचे प्रस्तावित केलेले आहे त्याचे बांधकाम अधिकृत असावे आणि सक्षम स्थानिक प्राधिकाऱ्याचा दाखला घ्यावा. [(नियम २५ (४) (डी) (v)]

६) एका जिल्हयातून दुसऱ्या जिल्हयात स्थलांतरीत होणाऱ्या अनुज्ञप्तीच्या दुकानांची संख्या ही जिल्हयातील चालू असलेल्या अनुज्ञप्ती दुकानाच्या एकूण संख्येच्या १५% पेक्षा जास्त असू नये. तसेच एका तालुक्यातून दुसऱ्या तालुक्यात स्थलांतरीत होणाऱ्या अनुज्ञप्तीच्या दुकानांची संख्या ही जिल्हयातील चालू असलेल्या अनुज्ञप्ती दुकानाच्या एकूण ३०% पेक्षा जास्त असू नये.

७) शासन अधिसूचना दि. ११.०६.२०२१ नुसार, प्रस्तावित केलेल्या जागेचे क्षेत्रफळ सत्तर चौरस मीटरपेक्षा जास्त नसावे. [(नियम २५ (४) (डी) (४-अ)]

**ड)** चंद्रपुर जिल्हयातील दारुबंदी उठविल्यानंतर, दि. ३१.०३.२०१५ पर्यत (दारुबंदी लागू होण्यापुर्वीची संख्या) चंद्रपूर जिल्हयामध्ये कार्यरत असलेल्या एफएल-II व सीएल-III अनुज्ञप्तीची संख्या विचारात घेऊन दि. २९.१२.२०१६ च्या अधिसुचनेमध्ये (स्थलांतर कोटा निश्चित) नमुद १५% स्थलांतराची मर्यादा चंद्रपुर जिल्हयातील स्थलांतरास लागु करण्याच्या दृष्टीने, शासन अधिसूचना दि. ०८.११.२०२१ अन्वये मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये सुधारणा करुन मुंबई विदेशी मद्य नियम (तिसरी सुधारणा) नियम, २०२१ त्याचप्रमाणे महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ मध्ये सुधारणा करुन महाराष्ट्र देशी मद्य नियम (तिसरी सुधारणा) नियम, २०२१ त्यानुसार, चंद्रपुर जिल्हयात व चंद्रपूर जिल्हयातून स्थलांतर होणाऱ्या एफएल-II व सीएल-III अनुज्ञप्तींकरीता दि. ३१.०५.२०१५ पर्यंत चंद्रपुर जिल्हयामध्ये कार्यरत अनुज्ञप्तींची संख्या विचारात घेऊन एक तालुका ते अन्य तालुका ३०% व एका जिल्हयातून दुसऱ्या जिल्हयात १५% टक्के प्रमाणे स्थलांतराची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

१२. राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांचे दुरध्वनी क्रमांक

| अ.क्र. | जिल्हा | कार्यालय दुरध्वनी |
|---|---|---|
| १ | प्रधान सचिव गृहविभाग रा.उ.शु. | २२०२५००९/२२०२३१८४ |
| २ | आयुक्त | २२६४०८०२ |
| ३ | अप्पर आयुक्त | २२६२२१२१ |
| ४ | सह आयुक्त (प्रशासन ) | २२६२०२३८ |
| ५ | सह आयुक्त (मळी / मद्यार्क ) | २२६६३६८५ |
| ६ | सह आयुक्त (अं व द.) | २२६६१९८७ |
| ७ | सह आयुक्त (संगणकीकरण) | |
| ८ | मुख्य लेखाअधिकारी | २२६६५५६९ |
| ९ | उप आयुक्त (औ. व सौं.प्र.) | २२६६०१६३ |
| १० | उप आयुक्त (निरीक्षण ) | २२६६०१५२ |
| ११ | उपआयुक्त (प्रशासन ) | २२६६५५६९ |
| १२ | उप आयुक्त (मळी / मद्यार्क ) | २२६६५५६९ |
| १३ | उप आयुक्त (प्रशिक्षणकेंद्र ) | |
| १४ | उप संचालक (सांख्यिकी व संगणक ) | २२६६५५७१ |
| १५ | लेखाधिकारी | २२६६५५६९ |
| १६ | सहा आयुक्त (आस्थापना) | |
| १७ | सहा आयुक्त (मळी / मद्यार्क) | |
| १८ | सहा आयुक्त (औ. व सौं.प्र.) | |
| १९ | सहा आयुक्त (देशी-विदेशी मद्य) | |
| २० | विभागीय उपआयुक्त, बृहन्मुंबई | ०२२२२६६४८०१ |
| २१ | विभागीय उपआयुक्त , ठाणे | ०२२-२५३२८६५२ |
| २२ | विभागीय उपआयुक्त, पुणे | ०२०-२६६८८३८२ |
| २३ | विभागीय उपआयुक्त , छत्रपती संभाजीनगर | ०२४०-२३३२७४७ |
| २४ | विभागीय उपआयुक्त , नागपूर | ०७१२-२७७८१०० |
| २५ | विभागीय उपआयुक्त , नाशिक | ०२५३-२३१९७४४ |
| २६ | विभागीय उपआयुक्त ,कोल्हापूर | ०२३१-२५४६०२७ |
| २७ | विभागीय उपआयुक्त ,नांदेड | ०२४६२-२२२२००१ |
| २८ | विभागीय उपआयुक्त ,अमरावती | ०७२१-२९९३११० |
| २९ | अधीक्षक, मुंबई शहर | २२६६४८०१ |

| | | |
|---|---|---|
| ३० | अधीक्षक , मुंबई उपनगरे-१ | २२६६२४०२ |
| ३१ | अधीक्षक , मुंबई उपनगरे-२ | |
| ३२ | अधीक्षक , ठाणे-१ | २५३२००५० |
| ३३ | अधीक्षक , ठाणे-२ | |
| ३४ | अधीक्षक , पालघर | ०२५२५-२४०४२२ |
| ३५ | अधीक्षक , रायगड | ०२१४१-२२८००१ |
| ३६ | अधीक्षक , नाशिक-१ | ०२५३-२५७८६३५ |
| ३७ | अधीक्षक , नाशिक-२ | |
| ३८ | अधीक्षक, धुळे | ०२५६२-२४१८८४ |
| ३९ | अधीक्षक, जळगाव | ०२५७-२२२३७१३ |
| ४० | अधीक्षक नंदुरबार | ०२५६४-२१००२४ |
| ४१ | अधीक्षक ,नागपूर -१ | ०७१२-२५६५९७१ |
| ४२ | अधीक्षक ,नागपूर -२ | |
| ४३ | अधीक्षक , वर्धा | ०७१५२-२४०१६३ |
| ४४ | अधीक्षक गोंदिया | |
| ४५ | अधीक्षक ,भंडारा | ०७१८४-२५२२९२ |
| ४६ | अधीक्षक , चंद्रपूर | ०७१७२-२५०५९५ |
| ४७ | अधीक्षक ,गडचिरोली | ०७१३२-२३३६०७ |
| ४८ | अधीक्षक , अमरावती | ०७२१-२६६३४१० |
| ४९ | अधीक्षक ,बुलढाणा | ०७२६२-२४२३०१ |
| ५० | अधीक्षक ,अकोला | ०७२४-२४३५०९२ |
| ५१ | अधीक्षक वाशिम | |
| ५२ | अधीक्षक , छत्रपती संभाजीनगर | ०२४०-२३३१०६० |
| ५३ | अधीक्षक , जालना | ०२४८२-२२५४७८ |
| ५४ | अधीक्षक ,धाराशिव | ०२४७२-२२३३८७ |
| ५५ | अधीक्षक , बीड | ०२४४२-२२२५०३ |
| ५६ | अधीक्षक, पुणे-१ | ०२०-२६१२७३२१ |
| ५७ | अधीक्षक, पुणे-२ | |
| ५८ | अधीक्षक,अहिल्यानगर-१ | ०२४१-२४७०८६० |
| ५९ | अधीक्षक,अहिल्यानगर-२ | |
| ६० | अधीक्षक, सोलापूर | ०२१७-२३१२३७६ |
| ६१ | अधीक्षक ,कोल्हापूर | ०२३१-२५४६०२७ |

| | | |
|---|---|---|
| ६२ | अधीक्षक, सातारा | ०२१६२-२२२३३९ |
| ६३ | अधीक्षक , सांगली | ०२३३-२६७०८७६ |
| ६४ | अधीक्षक, सिंधुदूर्ग | ०२३६२-२२८८३९ |
| ६५ | अधीक्षक, रत्नागिरी | ०२३५२-२२२४०३ |
| ६६ | अधीक्षक , नांदेड | ०२४६२-२८७६१६ |
| ६७ | अधीक्षक , लातूर | ०२३८२-२४५४१२ |
| ६८ | अधीक्षक , परभणी | ०२४५२-२२०३७३ |
| ६९ | अधीक्षक , हिंगोली | |

**१३.तक्रार निवारण अधिकारी**

विभागाकडून पुरविण्यात येणाऱ्या सेवा विहीत कालावधीत पुरविल्या न गेल्यास किंवा इतर काही तक्रारी असल्यास खालील अधिकाऱ्यांना भेटून किंवा पत्राद्वारे संपर्क साधावा.

| अ.क्र. | जनमाहिती अधिकारी | कार्यक्षेत्र | प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | सहाय्यक आयुक्त (आस्थापना) | कार्य.क्र.२,६,१०,१२ | उप-आयुक्त (प्रशासन) |
| २ | सहाय्यक आयुक्त (मळी व मद्यार्क) | कार्य.क्र.४ कार्य.क्र.५ कार्य.क्र.१४ | उप-आयुक्त (मळी व मद्यार्क) |
| ३ | सहाय्यक आयुक्त (देशी व विदेशी) | कार्य.क्र. ७ | उप-आयुक्त (निरिक्षण) |
| ४ | संशोधन सहाय्यक | कार्य.क्र. ८ | उपसंचालक सांख्यिकी व संगणक) |
| ५ | कार्यालय अधीक्षक | कार्य.क्र.९ | संचालक (अंमलबजावणी व दक्षता) |
| ६ | सहाय्यक आयुक्त (औ. व सौ.प्र.) | कार्य.क्र.३ कार्य.क्र.११ | उप-आयुक्त ( औ. व सौ. प्र.) |
| ७ | लेखाधिकारी | कार्य.क्र.१३ | सहसंचालक (लेखा व कोषागार) |

उपरोक्तप्रमाणे आयुक्त कार्यालयातील प्रथम अपिलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी म्हणुन कार्यरत राहतील. विभागीय स्तरावर मा. विभागीय उपआयुक्त हे प्रथम अपिलीय अधिकारी या पदावर राहतील तसेच जनमाहिती अधिकारी या पदावर सहाय्यक आयुक्त राहतील. तसेच सहाय्यक माहिती अधिकारी, कार्यालय अधीक्षक राहतील.जिल्हा स्तरावर जिल्हा अधीक्षक हे प्रथम अपीलीय अधिकारी या पदावर राहतील. तसेच यथास्थिती उपअधीक्षक / कार्यालय अधीक्षक हे जन माहिती अधिकारी राहतील.

सह आयुक्त (प्रशासन)
राज्य उत्पादन शुल्क भवन, प्लॉट नं.१४५०,
महानगरपालिका सभागृह मार्ग,
फोर्ट , मुंबई ४०० ००१
दुरध्वनी क्र.२२६२०२३८

## १४.नागरीक सनदेचा आढावा घेण्यासाठी मुदत

या विभागाच्या नागरीक सनदेचा आढावा घेण्यासाठी दोन वर्षाची मुदत विहित केली आहे. तदनुसार प्रति दोन वर्षांनी नागरीक सनदेचा आढावा घेण्यात येईल.